# श्रीविनायक

मुंबई म्हटलं की गणपतीच्या काही ठराविक मंदिरांचा उल्लेख आवर्जून केला जातो. परंतु या नगरीत अशीही काही मंदिरं आहेत जी इतरांसाठी अनोळखी आहेत, पण त्या परिसरासाठी आधारवडासारखे निश्चल आणि आशादायी आहेत. मुंबईतल्या अशाच काही मंदिरांचा हा परिचय...

# अनोळखी पण जागृत

## स्वयंभू बालगजानन- परळ



लालबाग-परळसारख्या कामगार वस्तीतल्या या स्वयंभू बाल गजाननाचं रूप पाहताना आश्चर्याचा सुखद धक्का बसल्याशिवाय राहत नाही. परळच्या चंडिका कंपाऊंडमध्ये गणेशवाडीतल्या पाषाणामध्ये प्रकट झालेली स्वयंभू श्री बालगणेशाची ही मूर्ती आहे. या पाषाणाभोवती फार जुनं घर असून ते आता मंदिर म्हणून ओळखलं जाऊ लागलं आहे. १९३२ च्या सुमारास गंगाराम नारायण साळुंखे यांना दृष्टांत होऊन या बालगजाननाचा शोध लागला. त्या दिवसापासून आजमितीस त्यांच्या अनेक पिढ्यांनी या गणेशाच्या सेवेला वाहून घेतलं आहे. हा गणपती पूर्वाभिमुख असून त्याचा उजवा हात गालावर असल्यामुळे याला श्रीबालगजानन असं नाव पडलं. दरवर्षी ६ फेब्रुवारीच्या सुमारास सूर्याची किरणं या गजाननाच्या मूर्तीवर पडतात व डोळे दिपतील असा किरणोत्सव पाहायला मिळतो. या बालगणेशाचा चेहरा अत्यंत लोभस व भावूक असून नवसाला पावणारा म्हणून तो प्रसिद्ध आहे. या गणपतीच्या प्रचितीबद्दल बऱ्याच आख्यायिका प्रचलित आहेत. काही विघ्नसंतोषी लोकांनी हे मंदिर पाडण्याचा बराच प्रयत्न केला पण त्यांना यश आलं नाही पण त्याचा फटका मात्र त्यांना जबर बसला असं इथल्या स्थानिकांचं म्हणणं आहे.१९३२ च्या सुमारास याच ठिकाणी स्वयंभू पिंडी सापडली होती. तिची प्राणप्रतिष्ठा करून याच ठिकाणी स्थापना केली. आजही या पिंडीभोवती नागराजांचा वावर असतो, असं इथल्या भक्तांचं मानणं आहे.

## नवसाला पावणारा फिन्ले मिलचा गणपती



या गणपतीची स्थापना ७ मे १९८९ रोजी फिन्ले मिलच्या कामगारांनी मिलच्या कंपाऊंडमध्ये केली. लालबाग, परळ विभागातल्या गणेशभक्तांना नेहमीच प्रभादेवीच्या सिद्धिविनायक मंदिरात जाणं शक्य होत नसे. या मंदिरामुळे इथल्या भाविकांना गणपतीचं दर्शन सुलभ झालं. या संगमरवरी मंदिरात गणेशाची पश्चिमाभिमुख सुंदर-सुबक अशी संगमरवरी मूर्ती आहे. पहाटे साडेपाचला होणाऱ्या आरतीला परिसरातले भाविक उपस्थित असतात. दिवसभर हे मंदिर दर्शनासाठी खुलं असतं. विशेष म्हणजे इथे पुजारी नसून भाविकच मूर्तीची षोडशोपचारे पूजा करतात. मंदिर आणि परिसराचं पावित्र्य भक्तांमुळेच अबाधित राहिलं आहे. हा गणपती नवसाला पावतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. इथे श्रीगणेश जयंती व माघी जयंती उत्साहात साजरी केली जाते.

## एअरइंडिया श्रीसिद्धीविनायक मंदिर



सध्या जिथे एअर इंडिया कॉलनी उभी आहे तो सांताक्रुझ पूर्वचा भाग म्हणजे पूर्वी फक्त दलदल होती. कॉलनीच्या उभारल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या सोयीसाठी इयत्ता सातवीपर्यंत मॉडर्न स्कूलची निर्मिती करण्यात आली. कालांतराने इयत्ता दहावीपर्यंतच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी नवीन बांधकामाची सुरुवात करण्यात आली. १९७४ मध्ये नवीन बांधकामासाठी पाया भरणी चालू असताना इमारतीपासून तीन फूट अंतरावर व जमिनीमध्ये पाच फूट खाली एक काळसर पाषाणाची गणेशमूर्ती एका कामगाराला सापडली. तेव्हा श्रींच्या मूर्तीखाली पाण्याचा जिवंत झरा तसंच पुरातनकालीन बांधकाम व चौथरा दिसला. शुक्रवार, १९ एप्रिल १९७४ रोजी दुपारी १२.३५ वाजता ही घटना घडली. ही घटना समजताच काही गणेशभक्तांनी या मूर्तीची स्थापना करण्याचं ठरवलं. परंतु काही लोकांचं म्हणणं होतं की या मूर्तीचं विसर्जन करावं. मूर्तीस्थापनेलाही बऱ्याच लोकांचा विरोध होता. त्या विरोधाला डावलून काही गणेशभक्तांनी मूर्तीची स्थापना केली. कालांतराने इथे श्रीगणेशाचं सुंदर संगमरवरी मंदिर उभं राहिलं. मंदिराचा सभामंडप भव्य असून त्याला संगमरवरी खांब आहेत. मूर्ती पूर्वाभिमुख आहे.

## श्रीगणेश मंदिर- भांडूप



मुंबई उपनगरातलं भांडूप प्रती कोकण म्हणून ओळखलं जातं. भांडूपमधल्या सर्व कोकणवासियांची श्रीगणेशावर अगाध श्रद्धा आहे. दरवर्षी ही मंडळी गणपतीसाठी कोकणात आपल्या गावी जातात. भांडूपमधल्या गणेशनगर परिसरातल्या रहिवाशांनी सुमारे २५ वर्षांपूर्वी या ठिकामी गणपतीचं मंदिर उभारण्याचा संकल्प केला. संपूर्ण मध्यमवर्गीय व कामगारवस्ती असल्यामुळे आर्थिक प्रश्न उभा राहिला. त्यावेळी परिसरातल्या दानशूर व्यक्तींनी तसंच स्थानिक रहिवाशांनी वर्गणी रुपाने निधी गोळा करून या मंदिराची उभारणी केली. ११ फेब्रुवारी १९८७ रोजी या मंदिरात श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. श्रीगणेशाची मूर्ती संगमरवरी असून त्यावर सुबक कोरीवकाम केलेलं आहे. मूर्ती पूर्वाभिमुख असून गाभाऱ्यामध्ये सुरेख नक्षीकाम केलेलं आहे. गाभाऱ्यामध्ये श्रीगणेशाच्या मूर्तीच्या एका बाजूला श्रीदत्त व दुसऱ्या बाजूला अंबामातेची मूर्ती आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर श्रीअष्टविनायकाच्या प्रतिमा आहेत. गाभाऱ्यात नेत्रदीपक प्रकाशयोजना केलेली आहे. मंदिरामध्ये हनुमान व शंकर यांच्यादेखील सुबक मूर्ती आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी या गणपतीची ख्याती आहे. गणेशमंदिराच्या मंडळातर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. रक्तदान शिबिरासारखे उपक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येतात. तसंच परिसरातल्या गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत तसंच वह्यावाटप दरवर्षी करण्यात येतं.

## वरशक्ती विनायक मंदिर- भांडूप



श्रीगणेश हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर सर्व भारतवासियांचं आराध्य दैवत आहे. याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे भांडूपमध्ये दक्षिण भारतीयांनी स्थापन केलेलं श्री वरशक्ती विनायक मंदिर. भांडूप मुक्कूलधर संघ गेली ३९ वर्ष भांडूपमध्ये गणेशोत्सवाच्या काळात महागणपती उत्सव साजरा करतो. या मंडळातर्फे सुमारे ३० वर्षांपूर्वी मंदिर उभारण्याचा संकल्प करण्यात आला. त्यानुसार १९८५ मध्ये मंदिर उभारण्यास सुरुवात झाली आणि १७ फेब्रुवारी १९८७ रोजी श्रीवरशक्ती विनायकाचं सुबक मंदिर तयार झालं. या मंदिरातली श्रीगणेशाची मूर्ती ही काळ्या पाषाणामध्ये घडवलेली आहे. हा पाषाण तामिळनाडूमधून आणण्यात आलेला आहे. मूर्ती पूर्वाभिमुख आहे. मंदिराचा कळस खास दाक्षिणात्य पद्धतीचा असून त्यावर देवीदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिरामध्ये रोज विधीवत पूजाअर्चा केली जाते. या मंदिराच्या परिसरात भाविकांसाठी व आबालवृद्धांसाठी आसनव्यवस्था केलेली आहे. अनेकजण मनःशांतीसाठी या मंदिर परिसरात येतात. तसंच सर्वांसाठी पाणपोईची व्यवस्थासुद्धा या मंदिर परिसरात करण्यात आलेली आहे. श्रीवरशक्ती विनायक वेल्फेअर असोसिएशनतर्फे दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. गरजू विद्यार्थ्यांना वह्यावाटप तसंच रुग्णांना मंडळातर्फे आर्थिक मदत केली जाते. स्वच्छता व नीटनेटकेपणा यामुळे मंदिर परिसरातलं वातावरण आल्हाददायक असतं.

**– डॉ. तुषार यशवंत सावडावकर**
*वास्तूतज्ज्ञ*